# प्रेसनोट

दि.२१/०६/२०२०

## चिखली पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय येथील पोलीस उपनिरीक्षकावर लाच स्विकारले प्रकरणी कारवाई

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | चिखली पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड, पुणे गु.र.नं. २४७/२०२० |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम – ७ |
| आरोपीचे नाव व कार्यालय | लोकसेवक - फारूख याकुब सय्यद सोलापूरे, वय ५६ वर्षे, पोलीस उपनिरीक्षक, वर्ग-२, चिखली पोलीस ठाणे अंतर्गत साने चौकी पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय, पुणे. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५,००,०००/- (पाच लाख) |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ५,००,०००/- (पाच लाख) |
| थोडक्यात माहिती. | पडताळणी दिनांक :- ०९/०६/२०२०, दि. ११/०६/२०२०, दि.१५/०६/२०२० व दिनांक १७/०६/२०२०<br>सापळा दिनांक :- २१/०६/२०२०<br>यातील तक्रारदार यांनी चिखली मोरेवस्ती येथे इमारत बांधली असून त्यामधील ०६ फ्लॅट विकलेले आहेत. ज्यांना विकले आहेत त्यांचेकडून पैसे येणे बाकी आहे. त्यासाठी तक्रारदार यांनी दिनांक २९/०५/२०२० रोजी तक्रार अर्ज चिखली पोलीस स्टेशन येथे दिलेला होता. तो अर्ज चौकशीसाठी लोकसेवक पोलीस उपनिरीक्षक सोलापूरे यांचेकडे आहे. सदर अर्जावरून गैरअर्जदार यांचेवर कारवाई करण्यासाठी व येणे बाकी असलेले पैसे मिळवून देण्यासाठी आलोसे यानी तक्रारदार यांचेकडे ५,००,०००/- रूपये लाचेची मागणी करून ती दिनांक २०/०६/२०२० रोजी स्विकारल्यावरून गुन्हा नोंद करण्यात आला आहे.<br>सदर गुन्हयाचे तपासकामी लोकसेवक पो.उप.निरी. फारूख सोलापूरे यास मा.विशेष न्यायालयाने दिनांक २४/०६/२०२० रोजी पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड दिली असून गुन्हयाचा तपास पोलीस निरीक्षक श्री. सुनिल बिले हे करत आहे. |

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. राजेश बनसोडे व मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. संजय पाटील, यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकावर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री. राजेश बनसोडे, पोलीस उप-आयुक्त/पोलीस अधीक्षक, लाचलुचप त प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. ॲन्टीकरप्शन ब्युरो, पुणे -
   दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी- पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
६. फेसबुकपेज- www.facebook.com-maharashtraACB
७. वेबसाईट- www.acbmaharashtra.gov.in

( श्रीहरी पाटील )
सहायक पोलीस आयुक्त/ पोलीस उप अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पुणे युनिट.